दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -९४ मंगळवार,दि.१० डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-94 | Tuesday, Dt.10 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# राज्यसभा सभापतींना हटवण्यासाठी अविश्वास प्रस्ताव आणणार



## ७० खासदारांचा पाठिंबा

नवी दिल्ली : राज्यसभेचे सभापती जगदीप धनखर यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी विरोधकांनी केली आहे. या प्रस्तावावर विरोधी पक्षाच्या ७० खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. इंडिया ब्लॉकमध्ये समाविष्ट असलेल्या सपा आणि टीएमसीनेही अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून दोन्ही पक्षांनी निदर्शनात भाग घेतलेला नाही.

इतका पक्षपाती सभापती पाहिला नाही

वृत्तसंस्था पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, ऑगस्टमध्येच विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्तावासाठी आवश्यक असलेल्या २० सदस्यांच्या सह्या गोळा केल्या होत्या. मात्र त्यांनी धनखड यांना आणखी एक संधी देण्याचा निर्णय घेतला होता. संसदेबाहेर काँग्रेस खासदार दिग्विजय सिंह म्हणाले की, मी माझ्या संपूर्ण राजकीय जीवनात इतका पक्षपाती सभापती पाहिला नाही.

केंद्र सरकार अदानींना वाचवत आहे

काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी म्हणाले की, मी केंद्र सरकारवर सभागृह कमकुवत केल्याचा आरोप करत आहे. प्रश्नोत्तराच्या तासात सर्व सरकारचे लोक उभे राहून उत्तरे येऊ देत नाहीत असे मी आजपर्यंत पाहिलेले नाही. माझा प्रश्न यादीमध्ये होता, पण मला प्रश्न विचारू दिला गेला नाही. प्रमोद तिवारी पुढे म्हणाले, अदानींचा पैसा आणि भ्रष्टाचारात भाजप सरकार समान भागीदार आहे. अदानी यांचे नाव पुढे येऊ नये असे त्यांना वाटते, त्यामुळे सभागृहाचे कामकाज चालू देत नाही.

काँग्रेसच्या परदेशी निधीचा मुद्दा भाजपने सभागृहात उपस्थित केला होता

शून्य प्रहरात भाजप खासदारांनी काँग्रेसला येणाऱ्या विदेशी निधीच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी केली. राज्यसभेतील नेते जे.पी. नड्डा यांनी फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया-पॅसिफिक (एफडीएल-एपी) संस्था आणि जॉर्ज सोरोस

(उर्वरीत पान २ वर)

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात

## पवनचक्की कंपनी व कॉन्ट्रॅक्टरवर खुनाचा गुन्हा दाखल करा

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांची मागणी

बीड (प्रतिनिधी) केज तालुक्यातील मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे आज अपहरण करुन त्यांचा खुन केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणामागे पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांचा व कॉन्ट्रॅक्टरचा हात असण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करुन पवनचक्की कंपनी व कॉन्ट्रॅक्टर वर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी केला आहे.



जिल्ह्यामध्ये पवनचक्की उभारण्याचे काम एका कंपनीकडून सुरू आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पवनचक्की उभारल्या जात आहेत. यासाठी संबंधीत कंपनीकडून शेतकऱ्यांना नियमानुसार जमिनीचा मावेजा देणे बंधनकारक आहे. मात्र बीड जिल्ह्यात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांची मनमानी सुरू आहे. जिल्हाभरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की

(उर्वरीत पान २ वर)

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यायचा नैतिक अधिकार मविआला नाही

### आ.सुरेश धस विरोधकांवर बरसले

आष्टी (प्रतिनिधी) विश्वरत्न भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत पराभूत करणाऱ्या काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा नैतिक अधिकार नाही असे सांगत नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानासाहेब पटोले यांना टोला लगावत मविआवर टीकेची जोड उठवली.


महाराष्ट्र विधानसभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अभिनंदन प्रस्तावावर ते बोलत होते.पुढे म्हणाले,



लोकसभा निवडणुकीमध्ये घटना बदलणार हा फेक निरेटिव्ह तयार करून जनतेची दिशाभूल केली.परंतु महायुतीच्या नेतृत्वाने कमाल केली आणि महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये या सर्वांची धूळधाण केली आहे. काँग्रेस राष्ट्रवादी आणि उबाठा शिवसेनेचे आमदार एका एसटी बस मध्ये बसणे एवढे देखील निवडून आले नाहीत कारण महाविकास आघाडीचे ५० देखील आमदार निवडून आलेले नाहीत. वास्तविक पाहता ५३ सिटाची एस टी बस असते परंतु एस टी भरेल एवढ्या जागा देखील महाविकास आघाडीच्या आल्या नाहीत.त्यामुळे त्यांनी शांत राहावे म्हणत हऱ्या नाऱ्याची गोष्ट सांगत आता महायुतीचं कसं होईल असा प्रश्न पडणाऱ्या महाविकास

(उर्वरीत पान २ वर)

## अपहरण करुन घातपाताचा संशय




केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचा मृतदेह दहीटना गावाजवळ आढळून आला असून घातपाताची शक्यता वर्तविण्यात येत आहे.सोमवार दि.०९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३-३० वाजण्याच्या सुमारास संतोष देशमुख यांचे डोणगाव टोलनाका जवळून अपहरण झाले होते.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,संतोष देशमुख हे त्यांच्या स्कार्पिओ गाडी क्रमांक एमएच ४४ बी ३०३२ या गाडीतून त्यांचे मामेभाऊ शिवराज लिंबराज देशमुख यांच्यासह मस्साजोगकडे जात होते. मार्गात डोणगाव टोल नाक्याजवळ चारचाकी वाहनातून आलेल्या व्यक्तींनी त्यांची गाडी अडवली.त्या गाडीतून उतरलेल्या सहा जणांनी संतोष देशमुख यांच्या गाडीची तोडफोड करून त्यांना ओढून काठीने मारहाण केली आणि नंतर त्यांना बळजबरीने गाडीत बसवून केजच्या दिशेने घेऊन गेले असल्याची तक्रार केज पोलीस

(उर्वरीत पान २ वर)

## बीड जिल्ह्यातील खरीप २०२४ चा प्रलंबित पिकविमा तसेच नुकत्याच झालेल्या अवकाळीच्या नुकसानीचे सॅम्पल सर्व्हे करुन शेतकऱ्यांना मदत करा - धनंजय मुंडेंची मागणी

## दोन्ही विषयी तातडीने निर्णय घेऊ - मुख्यमंत्री





मुंबई ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील खरीप हंगामात अतिवृष्टी व अन्य स्थानिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाले त्याबाबत तत्कालीन पालकमंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांनी भारतीय कृषी विमा कंपनीस जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून दिलेल्या निर्देशानुसार खरीप २०२४ चा पीकविमा अग्रीम २५% प्रमाणे पात्र शेतकऱ्यांना तातडीने वितरित करण्यात यावा त्याचबरोबर ३० नोव्हेंबर रोजी तामिळनाडू राज्यात आलेल्या 'फेंगल' चक्री वादळामुळे बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेलता अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे व फळांचे जे नुकसान झाले, त्यांचे सॅम्पल सर्व्हेक्षण करून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्याबाबतचे प्रस्ताव प्रशासनाकडून गतीने प्राप्त करून शेतकऱ्यांना मदत दिली जावी, अशी मागणी आज धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे.

धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या दोघांची यासंदर्भात भेट घेऊन मागण्यांचे पत्र उभय नेत्यांना दिले देत चर्चा केली. बीड जिल्ह्यात सप्टेंबर-ऑक्टोबर दरम्यान मोठ्या प्रमाणात सततची अतिवृष्टी झाल्याने खरिपातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून संपूर्ण नुकसानीचा आढावा घेत पीकविमा कंपनी व प्रशासनाची एकत्र बैठक घेऊन विमा कंपनीने प्राप्त तक्रारींच्या आधारे तातडीने सॅम्पल सर्व्हेक्षण करून घ्यावे व २५% अग्रीम विमा मंजूर करून शेतकऱ्यांना वितरित करावा, अशा सूचना केल्या होत्या. मात्र पुढे निवडणुकीची आचारसंहिता लागताच या प्रक्रियेची गती संथ झाली. त्यामुळे आता

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## रुग्णांच्या जीवाशी खेळुन बनावट व बोगस औषधांचा पुरवठा करणाऱ्या

## पुरवठादार व सबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी-माजी आमदार पृथ्वीराज साठे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरासह इतर ठिकाणच्या शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या जीवाशी खेळ करत रुग्णांना बोगस व बनावट औषधांचा पुरवठा करणाऱ्या संबंधित पुरवठादार व त्यांच्याशी हातमिळवणी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांना तात्काळ कठोर शासन करावे अशी मागणी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की अंबाजोगाई शहरातील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैधकीय महविद्यालय तथा रुग्णालय येथे दररोज किमान १५०० ते २००० रुग्ण उपचारासाठी येतात व उपचार घेतात . मराठवाड्यातील रुग्णांसाठी



आरोग्य संजीवनी म्हणून या शासकीय रुग्णालयाकडे पाहिले जाते. या रुग्णालयाला शासनामार्फत कंत्राट पद्धतीने औषधांचा पुरवठा केला जातो.

सदरील कंत्राटदार यांच्यामार्फत होत असलेला औषध पुरवठा हा बनावट व बोगस असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. औषध तपासणी कार्यालयाच्या वतीने तपासणी केलेल्या औषधामध्ये सदोष पणा आढळून आल्याचा निष्कर्ष औषध प्रशासनाने दिला आहे. सदर औषधे हि बनावट असल्याने त्या औषधामुळे रुग्णांच्या जीविताला धोका असून त्यांच्या जीविताला हानी पोहचू शकते. कदाचित अनेक रुग्णाच्या आरोग्य

(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

# दोन पुढे, चार मागे!

रिझर्व्ह बँकेच्या तिमाही पतधोरणात व्याजदर कपातीचा निर्णय घेतला गेला नाही, यात 'बातमी' नाही. व्याजदर बदलले जाणार नाहीत असा अंदाज अनेकांनी व्यक्त केलेला होता. तो बरोबर निघाला इतकेच. 'बातमी' आहे ती रिझर्व्ह बँकेने दिलेल्या कबुलीमध्ये. देशाच्या अर्थविकासाची गती आपण प्रत्यक्षापेक्षा जास्त गृहीत धरली अशी; अप्रत्यक्षपणे का असेना; पण कबुली रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण निवेदनातून आणि नंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या पत्रकार परिषदेतून दिली गेली. पतधोरणाचा निर्णय गव्हर्नर घेत नाहीत. त्यासाठी पाच सदस्यीय समिती असते आणि त्या समितीच्या बैठकीत हा निर्णय घेतला जातो. या बैठकीचे इतिवृत्त लवकरच प्रसृत होईल. पण दिसते ते असे की या समितीचे पाचही सदस्य व्याजदर कपात करू नये या मताचे होते. म्हणजे एका अर्थी या समितीने सरकारच्या दृष्टिकोनास केराची टोपली दाखवली. मध्यंतरी अर्थमंत्री निर्मला सीतारामन, वाणिज्य मंत्री पीयूष गोएल ते अनेक लुंगेसुंगे सरकारवादी खाद्यान्न घटक चलनवाढ मापनातून वगळले जायला हवेत, असे तत्त्वज्ञान मांडत होते. म्हणजे कांद्याबटाट्याच्या दरवाढीचा विचार केल्यामुळे चलनवाढ 'दिसते', सबब या अशा घटकांना चलनवाढ मापनातून वगळा, अशी यांची मसलत. म्हणजे गणितात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याने हा विषयच परीक्षेत घेऊ नका, अशी शिफारस करण्यासारखे. अलीकडे शिक्षण क्षेत्रात अशी शिफारस करणारे आणि तीपुढे मान तुकवणारे मोठ्या प्रमाणावर बोकाळले असले तरी निदान बँकिंग क्षेत्रात तरी शहाणपण अद्याप शिल्लक आहे म्हणायचे. शिक्षण क्षेत्रातून दुर्मीळ होत चाललेल्या शहाण्या शिक्षकाप्रमाणे रिझर्व्ह बँक वागली. गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या या खेपेच्या गव्हर्नरपदावरचे हे शेवटचे पतधोरण. त्यांना या पदावर आणखी एक मुदतवाढ मिळते किंवा कसे हे पुढील दोन दिवसांत स्पष्ट होईल. तूर्त या पतधोरणाविषयी.

त्यात या धोरण समितीने चलनवाढीचा वेग ही डोकेदुखी असल्याचे मान्य केले आणि सध्या घरंगळलेल्या विकास दराकडे पाहात देशाच्या आर्थिक वाढीचा आपला अंदाज कमी केला. गेली दोन वर्षे रिझर्व्ह बँकेस हे करावे लागलेले आहे. म्हणजे सुरुवात मोठी आश्वासक करायची आणि प्रत्येक तिमाहीला पुढल्या तिमाहींत हा दर कमी कमी होत जाईल हे मान्य करायचे. सरत्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेचा आलेख दाणकन आपटला. ते घरंगळणे नव्हते. ते आदळणे. कारण अपेक्षित विकासदरापेक्षा प्रत्यक्ष दर एक टक्क्याहून अधिक कमी आढळला. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने आपल्या भाकिताचीही पुनर्मांडणी केली असून देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या मते आपली वार्षिक वाढ सात टक्क्यांपेक्षा कमी असू शकेल. या दुःखावर मनमोहन सिंग सरकारच्या काळात विरोधी पक्षीय नेत्यांच्या राणा भीमदेवी वक्तव्यांचे स्मरण हा उतारा ठरेल. रुपया घसरल्याबद्दल, अर्थविकासाचा वेग मंदावत असल्याबद्दल, तो वाढवण्याची अक्कल आणि क्षमता तत्कालीन सरकारकडे कशी नाही याबद्दल विरोधी पक्षीय प्रेषितांनी त्या वेळी केलेली वक्तव्ये आता आठवली तर किमान अक्कल असलेल्यांसही 'त्या वेळेपेक्षा आता अर्थविकास मंद कसा' इतका साधा; वा डॉलरच्या तुलनेत रुपयाचा अवमूल्यनी अपमान अजूनही का सुरू असा प्रश्न पडू शकेल. त्या वेळी रुपयाचे मूल्य पंतप्रधानांच्या वयाप्रमाणे 'वाढत' जाईल अशा टिप्पणीतून त्यांना 'नामर्द' वगैरे ठरवणारे मर्द सध्या या विषयावर मौन पाळून असतात. अर्थात आता रिझर्व्ह बँक आणि अन्य सरकारी माध्यमातूनच अर्थव्यवस्थेचे वास्तव समोर येत असल्याने मौनाखेरीज पर्याय नाही.

दै.समर्थ राजयोग मंगळवार, दि.१० डिसेंबर २०२४

**CHANGE IN NAME**

I have Change My name From,
TOTARE SATISH BHIMRAO to ,
TOTRE SATISH BHIMRAO
Hence for this declaration in future
OLD NAME : TOTARE SATISH BHIMRAO
NEW NAME : TOTRE SATISH BHIMRAO
Address : A/p Doithan, Tq.Ashti, Dist.Beed
Mo.No.9623309515
Adhar No. 209121352516

# धर्माबादच्या युनिक कंप्यूटर्सला महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचा मानाचा गौरव

धर्माबाद ( अशोक पडोळे )

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या ४ डिसेंबर २०२४ रोजी लातूर येथे झालेल्या वार्षिक विभागीय बैठकीत धर्माबाद येथील युनिक कंप्यूटर्सला उत्कृष्ट कार्याबद्दल मानाचा गौरव प्राप्त झाला. संगणक प्रशिक्षण क्षेत्रात असामान्य कामगिरी केल्याबद्दल युनिक कंप्यूटर्सला या सन्मानाने गौरविण्यात आले. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वीणा कामत, मुख्य व्यवस्थापक अतुल पतोडी, अमित रानडे, नटराज कनकधोंड, विभागीय व्यवस्थापक कोशल ओहोळ, विभागीय समन्वयक महेश पत्रिके, जीवन लेंभे, आणि जिल्हा समन्वयक पंढरीनाथ आघाव यांच्या हस्ते युनिक कंप्यूटर्सला प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

धर्माबाद येथील युनिक कंप्यूटर्स ही शहरातील आणि तालुक्याची सर्वांत जुनी आणि प्रतिष्ठित संगणक प्रशिक्षण संस्था आहे. संस्थेने आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून त्यांना विविध क्षेत्रात नोकऱ्या मिळवून दिल्या आहेत. या संस्थेने विद्यार्थ्यांना चडउखढ, टॅली, डीटीपी, ऑफिस असिस्टंट, ऍडव्हान्स एक्सेल, सी, जावा आणि इतर संगणकीय कौशल्यांच्या अनेक अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना भारतात आणि परदेशातही उत्तम संधी उपलब्ध होत आहेत.

युनिक कंप्यूटर्सच्या विद्यार्थ्यांद्वारे अनेक यशस्वी नोकऱ्या प्राप्त झाल्या आहेत. संस्थेच्या कार्यशैलीमध्ये सुधारणा करत असताना, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवे ज्ञान विद्यार्थ्यांना पुरविण्यासाठी ही संस्था सातत्याने अग्रणी भूमिका बजावत आहे. युनिक कंप्यूटर्सने समाज




माध्यमांचा वापर करून शिक्षणाचे प्रचार-प्रसार वाढविला आहे, ज्यामुळे अधिक विद्यार्थ्यांपर्यंत संस्थेची माहिती पोहोचली आहे.

युनिक कंप्यूटर्सच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट संधी मिळत आहेत. संस्थेचे सर्व अभ्यासक्रम उद्योगाच्या मागणीनुसार शिकवले जात आहेत, ज्यामुळे विद्यार्थी नोकरीसाठी तयार होतात आणि त्यांचे करिअर उत्तम दिशा घेत आहे. डिसेंबर २०२४ रोजी लातूर येथे झालेल्या वार्षिक विभागीय बैठकीत धर्माबाद येथील युनिक कंप्यूटर्सला उत्कृष्ट कार्याबद्दल मानाचा गौरव प्राप्त झाला. संगणक प्रशिक्षण क्षेत्रात असामान्य कामगिरी केल्याबद्दल युनिक कंप्यूटर्सला या सन्मानाने गौरविण्यात आले.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वीणा कामत, मुख्य व्यवस्थापक अतुल पतोडी, अमित रानडे, नटराज कनकधोंड, विभागीय व्यवस्थापक कोशल ओहोळ, विभागीय समन्वयक महेश पत्रिके, जीवन लेंभे, आणि जिल्हा समन्वयक पंढरीनाथ आघाव यांच्या हस्ते युनिक कंप्यूटर्सला प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

धर्माबाद येथील युनिक कंप्यूटर्स ही शहरातील आणि तालुक्याची सर्वांत जुनी आणि प्रतिष्ठित संगणक प्रशिक्षण संस्था आहे. संस्थेने आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून त्यांना विविध क्षेत्रात नोकऱ्या मिळवून दिल्या आहेत. या संस्थेने विद्यार्थ्यांना चडउखढ, टॅली, डीटीपी, ऑफिस असिस्टंट, ऍडव्हान्स एक्सेल, सी, जावा आणि इतर संगणकीय कौशल्यांच्या अनेक अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना भारतात आणि परदेशातही उत्तम संधी उपलब्ध होत आहेत.

युनिक कंप्यूटर्सच्या विद्यार्थ्यांद्वारे अनेक यशस्वी नोकऱ्या प्राप्त झाल्या आहेत. संस्थेच्या कार्यशैलीमध्ये सुधारणा करत असताना, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवे ज्ञान विद्यार्थ्यांना पुरविण्यासाठी ही संस्था सातत्याने अग्रणी भूमिका बजावत आहे. युनिक कंप्यूटर्सने समाज माध्यमांचा वापर करून शिक्षणाचे प्रचार-प्रसार वाढविला आहे, ज्यामुळे अधिक विद्यार्थ्यांपर्यंत संस्थेची माहिती पोहोचली आहे.

युनिक कंप्यूटर्सच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट संधी मिळत आहेत. संस्थेचे सर्व अभ्यासक्रम उद्योगाच्या मागणीनुसार शिकवले जात आहेत, ज्यामुळे विद्यार्थी नोकरीसाठी तयार होतात आणि त्यांचे करिअर उत्तम दिशा घेत आहे.

# मायबाप जनतेसाठी सदैव तत्पर असणार आ.संदीप क्षीरसागर

आ.क्षीरसागरांनी घेतली विधानसभा सदस्यत्वाची शपथ

बीड ।प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे तब्बल दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.८) रोजी विधानसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. यावेळी मायबाप जनतेच्या आशीर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची संधी आणि जबाबदारी मिळाली असून मायबाप जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही आमदार संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त होताना दिली.




रविवारी (दि.८) रोजी महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांचा शपथविधी पार पडला. यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्पणरण करून आ.क्षीरसागर यांनी आमदारकीची शपथ घेतली. बीड विधानसभा मतदारसंघाचे असलेले सर्व प्रश्न या पवित्र सदनात मांडून बीडच्या जनतेने दिलेली जबाबदारी पार पाडणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

# लोकशाही दिन घेण्यासाठी तहसिल प्रशासनाची उदासीनता

## अ.भा.ग्राहक पंचायतचे तहसीलदारांना निवेदन

घनसावंगी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाकडून तालुकास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिन घेऊन सर्वसामान्य नागरिक,शेतकरी व शेतमजूर यांच्या समस्या सोडविण्याचे काम ऐकून घेऊन त्या समस्या संबंधित कार्यालयाकडून सोडविण्याचे काम केले जाते.व लोकशाही दिन हा तहसिल कार्यालयामार्फत घेण्याचे शासनाचे आदेश असतात परंतु तहसिल प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे लोकशाही दिनाची जनजागृती होत नसल्याने नागरिक आपल्या समस्या घेऊन येत नाहीत त्यामुळे तहसिल प्रशासनाकडून लोकशाही दिन घेण्यात येत




नसल्याची माहिती घनसावंगी तहसीलच्या तहसीलदार श्रीमती.योगिता खटावकर यांनी दिली असता अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जालना जिल्हा सरचिटणीस डॉ.रमेश तारगे व घनसावंगी तालुकाध्यक्ष मारोती सावंत यांनी तहसीलदार यांना आपल्या प्रशासनाकडून लोकशाही दिनाची जनजागृती केल्या जात नसल्याने नागरिकांना लोकशाही दिनाचे महत्व व तेथे सुटल्या जाणाऱ्या समस्यांची माहिती मिळत नसल्याने नागरिक आपल्या समस्या घेऊन येत नाहीत.त्यामुळे आपण आपल्या यंत्रणेमार्फत लोकशाही दिनाची जनजागृती करून व विविध वर्तमान पत्रातून प्रसिद्धी देऊन लोकशाही दिन घ्यावा अशा आशयाचे निवेदन देण्यात आले.व दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिन न घेतल्यास तहसिल कार्यालयासमोर अखिल भारतीय ग्राहक पंचायतकडून ढोल बजाव आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देताना अखिल भारतीय ग्राहक पंचायत जालना जिल्हा सरचिटणीस डॉ. रमेश तारगे, अखिल भारतीय ग्राहक पंचायत घनसावंगी तालुकाध्यक्ष मारोती सावंत,अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे घनसावंगी तालुका पदाधिकारी बाबासाहेब हेमके, मधुकर मुळे,कैलास मदनुरे,ज्ञानेश्वर सावंत, राजू हेमके, बन्सी पवार, राहुल काळे, विश्वास तारगे,अनिल लघाने उपस्थित होते.

# अंबड तहसील कार्यालयात सर्रासपणे नियमांची पायमल्ली!


## महत्त्वपूर्ण विभाग कुलूप बंद तर वरिष्ठांचा नियमांना ठेंगा!

अंबड ।प्रतिनिधी

भारत एक विशाल देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे प्रशासकीय कार्य सुलभतेसाठी अनेक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभागलेला आहे. या राज्यांचे पुढील विभाग जिल्हे म्हणून ओळखले जातात.हे जिल्हे पुन्हा अनेक उपविभागांमध्ये,म्हणजे तहसील किंवा तालुक्यांमध्ये विभागले गेले आहेत. हे उपविभाग पुन्हा ग्रामपंचायतींमध्ये विभागले गेले आहेत.सुरुवातीला हे जमीन महसूल गोळा करण्यासाठी आणि प्रशासनाच्या उद्देशाने केले जात असे. परंतु आता हे उपविभाग शासनाच्या इतर विभाग जसे की शासकीय योजना, शिक्षण,कृषी,पाटबंधारे, आरोग्य,पोलीस इ. यांच्या बरोबरीने शासित केले जातात. राज्य सरकारच्या विविध विभागांची कार्यालये सामान्यतः तहसील किंवा तालुका स्तरावर असतात.

तालुक्याचे मुख्य प्रशासकीय कार्यालय म्हणजे तहसील असते तर तहसीलदार हा तालुक्याचा मामलेदार असतो. करवसूलीव्यतिरिक्त तालुक्यातली इतर अनेक सरकारी कामे करतो.प्रसंगी दिवाणी दाव्यांमध्ये न्यायदानाचे महत्वपूर्ण कार्यही तहसीलदार मार्फत पार पाडावे लागते.अत्यंत महत्त्वपूर्ण प्रशासकीय व्यवस्था कार्यालय म्हणून तहसील कार्यालय ओळखले जाते. परंतु अंबड तहसील कार्यालय मात्र वरिष्ठांच्या काम चुकार पणामुळे व नियमाची पायमल्ली करत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहेत.

अंबड तहसील कार्यालयाची निर्धारित वेळ होऊन देखील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबरच अनेक जबाबदार कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसतात. आणि याचा फटका शेतकरी, मोलमजूर विद्यार्थी, निराधार, अपंग, न्यायाची प्रतीक्षा करणाऱ्यांना सहन करावा लागतो. दैनिक बदलता महाराष्ट्राचे पत्रकार अनिल भालेकर व दैनिक समर्थ राजयोग वृत्तपत्राचे पत्रकार शेख फारुक यांनी अंबड तहसील कार्यालयात जाऊन पाहणी केली असता कार्यालयाच्या कामकाजाची निर्धारित वेळ होऊन देखील बहुतांशी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी कार्यालयात हजर नव्हते. सर्वसामान्य जनतेच्या पोषण आहार(राशन) संदर्भात महत्वपूर्ण कार्यरत असणारा विभाग म्हणजे पुरवठा विभाग होय परंतु निर्धारित वेळेनंतरही पुरवठा विभाग बंद अवस्थेत दिसून आला. फक्त राशन चालकांच्या निर्देशावरच पुरवठा विभाग कार्यरत असल्याचे म्हणता येऊ शकेल?एकंदरीत अंबड तहसील कार्यालयातील वरिष्ठांची व कर्मचाऱ्यांची सर्रासपणे नियमाची पायमल्ली करत असल्याचे दिसून येत आहे.विधानसभा निवडणुकीचे महत्त्वपूर्ण कामकाज आता संपुष्टात आले असून आता प्रशासकीय कामकाजाकडे लक्ष देणे गरजेचे असताना देखील अंबड तहसील मधील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी अत्यंत



बेजबाबदारपने आणि काम चुकारपना करत असल्याचे एकंदरीत विदारक चित्र अंबड तहसील कार्यालयाकडे पाहून मानता येऊ शकते.

### पान १ वरून...

**पवनचक्की कंपनी ...**

कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितला तर स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीचे अधिकारी उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असल्याचा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. दरम्यान केज तालुक्यातील मस्सजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे दोन दिवसांपूर्वी पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत वाद झाल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणी गुन्हाही नोंद झाला आहे. या घटनेला दोन दिवसांचा कालावधी झाल्यानंतर आज डोणगाव परिसरातून संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले. यानंतर बोरगाव-दैठण रस्त्यावर त्यांचा मृतदेह आढळून आला. या खुनामागे पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचा व कॉन्ट्रॅक्टरचा हात असण्याची शक्यता असून पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कंपनी व कॉन्ट्रॅक्टर वर कुणाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मुळूक, गलधर यांनी केला आहे.

**बीड जिल्ह्यातील खरीप २०२४..**

पीकविमा कंपनीने तातडीने सदर २५% अग्रीम विमा वितरित करावा याबाबत भारतीय कृषी विमा कंपनीस राज्य शासन स्तरावरून आदेश व्हावेत, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली असून याबाबत तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

तामिळनाडू मध्ये ३० नोव्हेंबर दरम्यान आलेल्या फेंगल चक्री वादळाच्या परिणाम स्वरूप बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी डिसेंम्बर च्या पहिल्या आठवड्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. बीड जिल्ह्यात सतत दोन ते तीन दिवस अचानक हवामान बदलून हलका व मध्यम स्वरूपाचा अवकाळी पाऊस झाला; यामुळे रब्बीतील तुरीसह खरिपातील गहु, ज्वारी, हरभरा, भाजीपाला व फळपिके आदींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या नुकसानीचे देखील सॅम्पल सर्व्हेक्षण करून जिल्हा प्रशासनाकडून मदतीचे अहवाल प्राप्त केले जावेत व जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जावी, असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या मागणी पत्रात नमूद केले असून याबाबतही तातडीने निर्णय घेण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी म्हटले आहे.

### पान १ वरून...

**राज्यसभा सभापतींना ...**

यांच्यातील संबंधांवर प्रश्न उपस्थित केला. या फोरमला जम्मू-काश्मीर भारतापासून वेगळे करायचे आहे आणि त्याला राजीव गांधी फाऊंडेशनकडून आर्थिक मदत मिळते, असा दावा त्यांनी केला. भाजपला अदानी प्रकरणावरून लक्ष हटवायचे आहे, असे कॉंग्रेसचे म्हणणे आहे. त्यामुळे कॉंग्रेसवर विदेशी निधीचा आरोप होत आहे. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि कॉंग्रेसच्या नेत्यांनी धनखड भाजपच्या बाजूने पक्षपाती असल्याचा आरोप केला.

**अपहरण करुन...**

ठाण्यात शिवराज देशमुख यांनी दिली.सदर तक्रारीवरून सहा व्यक्तीं वर गुन्हा दाखलकरण्यात आला.घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांची दोन पथके तातडीने देशमुख यांच्याशोधासाठी निघाली.मात्र काही वेळा नंतर दैठणा गावाच्या रस्त्यावर संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला.दरम्यान संतोष देशमुख यांच्या मृत्यूमागे घातपात असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.केज पोलीस पुढील तपास करत असून त्यानंतरच अधिकृत माहिती समोर येऊ शकेल.संतोष देशमुख हे त्यांच्या अनेक चांगल्या कार्यामुळे तालुक्यात परिचित आहेत.त्यांनी त्यांच्या कार्यकाळात मस्साजोग ग्राम पंचायत ला अनेक पुरस्कार मिळवून दिले.त्यांच्या मृत्यूमुळे तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.दरम्यान सदरील घटनेमुळे परिसरात दहशत पसरली आहे.

**महामानव डॉ.बाबासाहेब...**

आघाडीच्या नेत्यांची तुलना त्यांनी हऱ्या आणि नाऱ्या यांच्या गोष्टीशी करून सभागृहात निर्माण केला आणि विरोधकांना चांगलेच धारेवर धरून विधानसभेच्या पहिल्याच विशेष अधिवेशनात आ.सुरेश धस विरोधकांवर चांगलेच बरसले.

अत्यंत चाणक्य बुद्धिमत्ता असलेले आणि कायदे पंडित असलेले राहुल नार्वेकर यांनी अति अत्यंत चांगला रामशास्त्री प्रभुणे बाण्याने विधानसभेचे सभागृह चालवले विरोधकांच्या बेकायदेशीर वक्तव्यांना देखील त्यांनी सहन केले महाविकास आघाडीचा सकाळी नऊ वाजता वाजणारा भोंगा आणि पक्षप्रमुख यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका केली ही अत्यंत निंदनीय बाब असल्याचे सांगत विरोधकांवर टीकेची जोड उठवली.

सोमवारी विधानसभेच्या विशेष अधिवेशनाचा तिसरा आणि शेवटचा दिवस होता.गेल्या दोन दिवसांपासून जवळपास सर्व आमदारांनी शपथ घेतल्यानंतर

### पान १ वरून...

सोमवारी विधानसभा अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.यावेळी नार्वेकर यांच्या अभिनंदन प्रस्तावावर बोलताना आ.सुरेश धस यांनी आपल्या अस्सल ग्रामीण भाषेत नुकत्याच विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्लेल्या महाविकास आघाडीने आता शांत राहाव असे सांगत राहुल नार्वेकर यांनी आजपर्यंत विधानसभेचे अध्यक्ष म्हणून आपली चोख भूमिका पार पाडली आहे.स्वतः वकील असल्याने त्यांना कायद्याचा अभ्यास आहे ते योग्यरीत्या सभागृह चालवतील आणि प्रत्येकाला बोलण्याची संधी ते देतील असा विश्वास आ.धस यांनी व्यक्त केला.तर दुसरीकडे विरोधकांची निवडून आलेल्या आमदारांची एकूण बेरीज पाहता एस. टी.देखील भरणार नाही असे म्हणत हऱ्या नाऱ्याची गोष्ट सांगत विरोधकांवर चांगलेच बरसले.त्याच्या याच भाषणाची सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे.

**पुरवठादार व सबंधित ...**

व जीविताचे नुकसान झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ अंबाजोगाई शासकीय रुग्णालयातच नव्हे तर सदर बनावट औषधांचा पुरवठा हा नागपूर, ठाणे, वर्धा, जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात पुरवठा केला गेल्याची अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे यात अनेक कंपन्या, पुरवठादार व शासनाचे अनेक अधिकारी सामील असल्याची शक्यता नाकारता येत नाही. असे बनावट काम करणारी टोळी देशभरात सक्रीय असल्याची शक्यता नाकारता नसल्याचे पृथ्वीराज साठे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

या बनावट व बोगसगिरी करणाऱ्या कंपनी, कंत्राटदार व त्यांच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची या बाबत सखोल चौकशी करून त्यात आढळणाऱ्या दोषींना कडक शासन करून नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्याच्या उद्देशाने सदर गुन्ह्याच्या तपासासाठी निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती (एस.आय.टी.) नेमण्यात येऊन दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केज विधानसभेचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली आहे. तसेच या निवेदनाची दखल न घेतल्यास रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने जनांदोलन छेडले जाईल असा इशारा देखील माजी आमदार पृथ्वीराज साठे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासनास दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# देवहिवरा येथे कुस्ती स्पर्धेची पारंपारीक परंपरा

## दरवर्षी ग्रामीण भागातील पैलवान घेतात सहभाग

घनसावंगी ।प्रतिनिधी

तालुक्यातील देवहिवरा येथील खंडोबा यात्रेनिम्मीत दरवर्षी कुस्ती स्पर्धेस चांगला प्रतिसाद मिळतो या स्पर्धेला जालना जिल्ह्याबरोबर सभोवतालच्या औरंगाबाद, परभणी, बीड या जिल्ह्यातील कुस्ती पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. अनेकांनी यात चांगले बक्षिस मिळवले. विशेष म्हणजे बक्षिसांची सर्व रक्कम लोकवर्गणीतून जमा होत असल्याने या स्पर्धेला आगळे वेगळे महत्व आहे.

देवहिवरा येथील खंडोबा हे देवस्थान सर्व गावकर्यांचे श्रद्धास्थान असून अनेक वर्षापासून येथे कुस्ती स्पर्धा ठेवण्यात येते या साठी बक्षिसाची रक्कम व इतर खर्च गावकर्यांच्या वर्गणीतून करण्यात येतो सर्वसामान्य नागरिकांच्यावतीने कुस्तीची आवड कायम ठेवण्यासाठी या स्पर्धेस हवी असणारी वर्गणीची रक्कम मोठ्या उत्साहाने दिली जाते. कुस्तीसाठी दरवर्षी बाचेगाव, वडीरामसगाव, भांबेरी, भार्डी, मांदळा, राणीउचेंगाव, पानेवाडी,लोणारभायगाव,गोंदी, भाटेपुरी,मौजपुरी यासह बीड, पैठण,जालना,औरंगाबाद येथील पैलवान सहभाग नोंदवतात यात युवकांचा जास्त भरणा होता जुन्या पैलवांनाकडून कुस्तीचे धडे ग्रामीण भागात घेऊन त्यांनी ठिकठिकाणी असलेल्या कुस्ती स्पर्धेत सहभाग घेऊन कुस्ती जिकूंन मिळालेल्या बक्षिसांची रक्कम कमी असली तरी कुस्ती खेळण्यांचा आनंद काही औरंच असून कुस्ती सभोवताली हलगी वाजवून कुस्तीच्या पैलवांनाना दिलेल्या उत्तेजना व कुस्तीवर मात केल्याचा आनंद शेवटी या पैलवानांना उत्साहाचा वाटत होता. पैलवानाला मैदानातून फिरवल्यानंतर रक्कम लावून दुसरा पैलवान कुस्ती खेळण्यास तयार होऊन मग ठरलेल्या रक्कमेनुसार कुस्ती होते त्यात वयोगट, शरीराच्या स्थितीनुसार सारख्या पैलावानांशी कुस्ती लावण्यात येते त्याला ढपड्याच्या आवाजाने त्यांला प्रोत्साहन दिले जाते जो प्रतिस्पर्धीला पाडतो त्यांच्यावर बक्षिसाचा वर्षाव करण्यात येतो अशा प्रकारे अनेक पैलवानांशी कुस्ती लावून कुस्ती जिंकल्या जातात दरवर्षी एक लाखांच्यावर रक्कमेच्या कुस्त्या लावण्यात येतात यात पाचशे रूपयापासून कुस्ती स्पर्धा सुरू होते ती शेवटी सात हजारापर्यंत जाते.पैलवानांच्या संख्येनुसार कुस्त्यांची चढाओढ सुरू होते विशेष म्हणजेबाहेर गावाहून आलेल्या व पराभूत



झालेल्या कुस्ती पैलवानांना गावी परतण्यासाठी काही खर्चही गावकरी माथी मारून घेतात परंतू अनेक वर्षाची आपल्या कुस्ती या खेळाला असलेली प्रतिष्ठा कायम राहावी यासाठी गावकर्यांचा दरवर्षी हा खटाटोप असतो यातून कुस्ती खेळांची आवड जोपासणे कुस्तीची प्रतिष्ठा कायम ठेवणे हाच उद्देश असतो. विविध कार्यक्रम खंडोबा रमाबाई यात्रा निमित्त कुस्त्याच्या दंगलीचा कार्यक्रम संपन्न झाला. शनिवार रोजी बारा गाड्याचा कार्यक्रम व श्री. बबनराव बापूराव चव्हाण खंडोबा भक्त देवदर्शन होईल तर रविवार रोजी जंगी कुस्तीची दंगल आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ५१ रुपयापासून ७७७७ रुपये पर्यंत एकूण ७७ हजार ७७७ रुपयाच्या कुस्त्या लावण्यात आल्या.या कार्यक्रमास माजी ज़िल्हा परिषद सदस्य काशिनाथ मते, पंढरीनाथ मते, साई जाधव, नारायण शेडगे, नवनाथ लोणे, बाळासाहेब गाढे, संतोष खाडे, सतीश उगले, बद्री खाडे, किसनराव शिंदे, गणेश जवळकर, कृष्णा उगले, प्रकाश जवळकर, श्रीधर मते, राहुल मते, प्रवीण चव्हाण, त्रिंबक मते, परमेश्वर मते, सिद्धेश्वर मते, कल्याणराव मते, गोवर्धन मते, गीताराम मते, बाबासाहेब जवळकर, अनिरुद्ध मते, अमोल मते, कैलास वाघमारे, हरिश्चंद्र मते, दत्तात्रय मते, शरद जवळकर, विलास शेडगे, जगन्नाथ बर्डे, रवींद्र शेडगे, दिलीप गाडे, बंडू उगले, शिवाजी मदनुरे, दिलीप तौर, गजानन ठूले, विजयकुमार मते, विट्ठल काळे, हनुमंत बर्डे, विष्णू काळे, विकास बर्डे, अनिरुद्ध मते, बाबासाहेब जवळकर, सिद्धेश्वर शिंदे, सिद्धेश्वर मते, सोपान बेलनुरे, अजितराव गोरे, मनोहर जवळकर, जगन्नाथ जवळकर, गयादास मते, सोपान मते, त्रिंबक मते, शिवाजी मदनूरे यांच्या सह अनेकांची उपस्थित होते.

कुस्ती खेळण्याची लहानपणापासून आवड आहे त्यामुळे शरीराच्या प्रकृतीची काळजी घेण्याबरोबर योग्य व पोषक आहार प्रकृती सुदृढ ठेवून कुस्ती खेळतोच ग्रामीण भागात कुस्तीचे प्रशिक्षक नसले तरी जुन्या जाणत्या कुस्ती पैलवानाकडून कुस्तीतील डावपेच सर्व अवगत करून घेतले आहे.महाराष्ट्रात अनेक ठिकाणी यात्रा असतात अशा यात्रेनिम्मीत कुस्ती स्पर्धा असली की घरची कामे सोडून कुस्ती खेळतो बक्षीस मिळो वा नाही मिळो परंतु कुस्तीची आवड मात्र लागली आहे यातच आनंद वाटतो.

–शिवाजी बाबर , पैलवान

दरवर्षी खंडोबांच्या यात्रेनिम्मीत कुस्ती स्पर्धा येथे घेण्यात येते. ग्रामीण भागातील मुलांना आपल्या शरीराची काळजी घ्यावे व प्रकृती काय असते हे त्यांना या कुस्ती स्पर्धेच्या दरम्यान कळते त्यामुळे कुस्ती स्पर्धा अनेक वर्षापासून येथे ठेवण्यात येत आहे त्यास चांगला प्रतिसाद मिळतो.

– काशीनाथ मते, संयोजक



केज – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंदरी ता.केज येथे सरपंच सौ. अश्विनी धनसंपत ठोंबरे यांच्या वाढदिवसा निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास उपसरपंच दिपक सोनवणे, अशोक गाडे,प्रशांत ठोंबरे, नितिन ठोंबरे,अमर ठोंबरे,अमोल गाडे, प्रशांत ठोंबरे, कामराज ठोंबरे, राहुल ठोंबरे,हर्षल ठोंबरे आदीसह सर्व उपस्थित शाळेतील सर्व स्टाफ व अंगणवाडीतील सर्व स्टाफ उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्यात व अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात बनावट औषधी पुरवणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करा

### शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात व स्वराती शासकीय रुग्णालय अंबाजोगाई येथे लाखो बनावट औषधी पुरवणाऱ्या कंपन्यांचा पर्दाफाश झाला आहे, या अनुषंगाने आज शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी सर्व बीड जिल्हा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन बीड जिल्हाधिकारी कार्यालय,पोलीस अधीक्षक व जिल्हा शल्य चिकित्सक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे. या निवेदनामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व गणेश वरेकर यांनी असे म्हटले आहे की, गेल्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात जवळपास ४० हजार बनावट औषधांची वाटप झाली आहे व राज्यात जवळपास ८५ लाख बनावट औषधांची वाटप झाली आहे अशा प्रकारे अंबाजोगाई सह राज्यामध्ये



बनावट औषधे पुरवून रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या कंपन्यांना कोणाचे अभय आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.या औषधांची निर्मिती कोठे झाली, त्याची पडताळणी झाली आहे का त्या कंपन्यांना परवानगी कशी मिळाली, या बनावट टोळीने ही औषधे कशी बनवली,याचा उलगडा झाला पाहिजे.तसेच परराज्यातून अनेक कंपन्या शासकीय रुग्णालयात औषधे पुरवठा करतात यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचे काय संबंध आहेत हे सुद्धा तपासले पाहिजे, या पाठीमागे सरकारमधील मंत्र्यांनी आर्थिक व्यवहार करून अशा बनावट कंपन्यांना परवानगी दिली आहे का, याची चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर सुद्धा गुन्हे दाखल करावेत असे निवेदनात म्हटले आहे.येत्या आठ दिवसात वरील सर्व बाबींचा तपास करून दोषींवरती गुन्हे दाखल न झाल्यास बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व परमेश्वर सातपुते सर ,यांच्यासह शिवसेनेचे तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण यांनी दिला आहे..यावेळी जिल्हा सहसचिव कृष्णाजी गायके, युवासेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले,युवा नेते मुकेश घुमरे,उप तालुका प्रमुख अशोक सगळे, उप तालुका प्रमुख प्रकाश दुथाडमल , सर्कल प्रमुख अशोक खाडे, सर्कल प्रमुख दत्ता सुरवसे, सखाराम तात्या मोहिते,विनोद गुंड पाटील, दीपक घोडके पाटील, अजय गायकवाड पाटील, भिमरावजी कुटे सह सर्व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

### स्वस्त धान्य दुकानातुन निकृष्ट धान्य वाटप व मनमानी कारभार विरोधात तहसीलदारांना

# स्वस्त धान्य दुकानातील तांदळाच्या खिचडीचे वाटप

# लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड: देशात गोरगरीबांसाठी, दुर्बल घटकांसाठी शासनामार्फत अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत, अंत्योदय अन्न योजना आदिच्या माध्यमातून राशनकार्ड धारकांना मोफत धान्य वाटप करण्यात येते.परंतु अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकानदारच लाभार्थ्यांच्या रेशनवर डल्ला मारतो.राशन देताना काटा मारणे, धान्य कमी मोजुन देणे तर काही लाभार्थ्यांना धान्य संपल्याची थाप मारून बोळवण केली जाते. स्वस्त धान्य दुकानदारांकडून रेशनच्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असुन काळ्या बाजारातुन धान्याची खरेदी विक्री होत असल्याच्या घटना आढळून येतात.बीड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार दारांकडुन रेशनकार्ड धारकांना निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत.रेशनवर नियंत्रण ठेवणा–या दक्षता समित्या कागदोपत्रीच असुन सामान्य लोकांच्या हक्काचे उल्लंघन आणि स्वस्त धान्य दुकानदारांकडुन रेशनच्या धान्याची काळ्या बाजारात खरेदी विक्री आणि रेशनकार्ड धारकांनी विचारणा केल्यास अरेरावी आदी प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांचे अक्षम्य दुर्लक्ष यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०९ सोमवार रोजी सकाळी बीड तहसिल कार्यालयाच्या आवारात दगडाच्या चुलीवर स्वस्त धान्य दुकानातुन वाटप झालेल्या निकृष्ट दर्जाच्या तांदळाची खिचडी शिजवून तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या समोर ठेवून ग्रामस्थांनी निकृष्ट धान्य वाटप आणि स्वस्त धान्य दुकानदार यांच्या मनमानी कारभाराच्या समस्या मांडल्या.प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करण्यात आले. निवेदन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन,शेख मुस्ताक, बप्पासाहेब पवार, अंकुश परीहार,अर्जुन ससाणे,सुमन ससाणे,दैवशाला ससाणे, सुभाबाई ससाणे,बाळु साबळे, नवनाथ घोलप,शेख नदीम शेख करीम, बापुराव येडे, ईश्वर चव्हाण आदी सहभागी होते.

रेशन दुकानाचा कारभार पारदर्शक व्हावा, नागरीकांना धान्य पुरवठ्यात काही अडचण येऊ नये यासाठी प्रत्येक रेशन दुकानासाठी दक्षता समिती स्थापन करण्यात येते. ग्रामपातळीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत रेशन दुकानातुन वितरीत करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंवर देखरेख ठेवण्यासाठी अध्यक्ष, सचिव, सदस्य अशी १२ अशासकीय पदे असलेल्या दक्षता समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे.अशासकीय समित्यांवर सरपंच अध्यक्ष, तलाठी सचिव तर सदस्यांमध्ये विविध कार्यकारी सोसायटी,३ महिला,विरोधी पक्षाचे २ सदस्य, अनुसूचित जाती प्रतिनिधी, अनुसूचित जमाती प्रतिनिधी व एक सामाजिक कार्यकर्ता यांचा समावेश असतो.या सर्वांचा कालावधी ३ वर्षाचा




असतो.प्रत्येक महिन्यातुन एकदा बैठक घेऊन बैठकीचा अहवाल तहसीलदारांना पाठवावा लागतो.सर्व दक्षता समित्यांच्या बैठका वेळच्या वेळी घेतल्या जातात की नाही याची खातरजमा जिल्हास्तरावरील अपर जिल्हाधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.दक्षता समितीची कामे शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तुंचा पाठपुरावा स्वस्त धान्य दुकानांतुन केला जातो किंवा नाही हे तपासणे, बनावट , खोट्या शिधापत्रिका व शिधापत्रिका न मिळालेल्या गरजु रहिवासी याबाबत आढावा घेणे, धान्य दुकानातून गैरप्रकारांना आळा घालणे, गावातील प्राप्त तक्रार नोंदवही तपासणे व इतर अशी अनेक कार्ये दक्षता समिती मार्फत पार पाडली जातात मात्र दक्षता समितीतील पदाधिकारी केवळ आता नामधारी राहीले असुन कागदोपत्रीच दक्षता समित्या अस्तित्वात असुन त्या सक्षम करण्यात याव्यात आणि हलगर्जीपणा करणारांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत शासकीय स्वस्त धान्य दुकानातुन रेशनकार्ड धारकांना वाटप करण्यात येणारे गहु, तांदूळ,डाळ आदि धान्य निकृष्ट दर्जाचे ३-४ वर्षापुर्वीचे पिवळसर,काळसर रंगाचे किडलेल्या अवस्थेत तसेच माती,खडे आदी मिश्रण असलेले आढळून येत असुन जनावरेही तोंड लावणार नाहीत असे निकृष्ट धान्यांचे वाटप करण्यात येत असून नविन धान्यांचे वापट करावे. निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी.रेशन दुकानदाराने दर्शनी भागात दक्षता समिती सदस्यांची नावे लावावी,दर्शनी भागात लाभार्थ्यांच्या याद्या लावणे, धान्य दराचे फलक दर्शनी भागात लावणे, तक्रार नोंदवही उपलब्ध करून देणे, धान्यांचे नमुने दर्शनी भागात ठेवणे आदि महाराष्ट्र अनुसूचित वस्तू वितरणाचे विनियमन आदेश १९७५ मधील तरतुदीचे तसेच प्राधीकार प्रतितील अटी शर्थींचा भंग केल्याचे दिसून येते. त्या अंतर्गत स्वस्त धान्य दुकानांचे प्राधिकार पत्र ३ महिन्यांकरीता निलंबित करण्याचे अधिकार आहेत.मात्र जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदार संबंधित प्रकरणात चौकशी व कारवाईस जाणिवपूर्वक टाळाटाळ करताना दिसुन येतात. संबंधित प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/७५८
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २५/१०/२०२४

अर्जदार श्री./ :- १)साजन योगीनाथ चव्हाण २) सगुणा साईनाथ चव्हाण प्रकरण :- सर्व्हे नं. .९९ प्लॉट नं.६५ सिटी सर्व्हे नं.२५१२ न.प.मि.नं.१८-१३६-६५/१मधील ६७.७९ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १८-१३६-६५/१ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नंबर ६४
दक्षिण :- याच प्लॉट नंबर ६५ मधील उर्वरित भाग
उत्तर :- सर्व्हे नंबर १०० ची जागा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

## राजर्षी शाहू महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या संचालक पदावर मोमीन मुश्ताक सर



माजलगाव/ प्रतिनिधी

राजर्षी शाहू महाराज मा.व इ. मा.पत संस्था माजलगाव,पत संस्थेचे अध्यक्ष,सचिव व सर्व सदस्यांच्या सर्वानुमते महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना चे उपाध्यक्ष मोमीन मुश्ताक सर स.शि.इंदिरा नगर यांना पत संस्थेच्या संचालक पदावर स्वीक्रत सदस्य म्हणून घेतल्या बद्दल त्यांचा आभार कार्यक्रम घेण्यात आला.तसेच अँड.शेख खलील सर यांनी नोटरी ऑनलाईन परीक्षा पास केल्या बद्दल त्यांचा पण सत्कार करण्यात आला. जि.प. मा.शा.( मुलांची) माजलगाव शाळेत कार्यक्रम घेण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मू.अ.शेख मंजूर सर होते.तर सत्कार मूर्ती राजर्षी शाहू महाराज पत संस्थेचे अध्यक्ष श्री.कपिल डोंगरे सर,उपाध्यक्ष श्री. काठुळे सर,सचिव श्री.साहेबराव चव्हाण सर,श्री. मोमीन मुस्ताक सर व अँड.शेख खलील सर हे होते. प्रमुख पाहुणे श्री शेख युनूस सर मु.अ.इंदिरानगर हे होते.

सूत्र संचालक श्री.खतीब अजीम सर होते तर प्रस्तावना एजाज सिद्दिकी, तालुका अध्यक्ष महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना यांनी केली. पतसंस्थेचे सचिव श्री. साहेबराव चव्हाण सर व सय्यद अय्युब सर यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच अँड.शेख खलील सर यांनी नोटरी बाबत सखोल माहिती दिली व गरीब विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य काम करण्याचे आश्वासन दिले. पठाण खाजा खान उर्दू संघटना सचिव यांनी आभार प्रदर्शन केले कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.


# विधान भवनात शपथविधी वेळी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचा विसर पडलेल्या बीड जिल्ह्यातील आमदारांचा जाहीर निषेध!

## येथून पुढे निवडणुकीत अण्णाभाऊंचे नाव घेऊन मताचा जोगवा मागू नका - मातंग समाजाचे युवा नेते संजय धुरंधरे यांचा इशारा

बीड ।प्रतिनिधी

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी सक्रिय सहभाग घेऊन मुंबई महाराष्ट्राची होण्यासाठी अथक परिश्रम घेतले तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये आपल्या शहीरीच्या माध्यमातून स्पुर्ती निर्माण केली. दलित, शोषित, पीडित, वंचित, घटक आणि कष्टकरी, कामगार, स्त्रिया यांचा दबलेला आवाज जगभर पोहोचवला. या महान महापुरुषाच्या नावावर राजकारण करत आज अनेक उमेदवारांनी निवडणुकीमध्ये मतांचा जोगवा मागितला मात्र निवडून आल्यानंतर या उमेदवारांनी विधान भवनात शपथविधी वेळी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव घेण्याचा विसर पडला. येथून पुढे निवडणुकीमध्ये साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या नावावर मतांचा जोगवा मागू नका अशी संतप्त भावना मातंग समाजाचे युवा नेते संजय धुरंधरे यांनी व्यक्त केली आहे.

बीड जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत जिल्ह्यातील विविध पक्षाच्या उमेदवाराने मातंग समाजाची मते मिळविण्यासाठी अण्णाभाऊंचे नाव घेत मतांचा जोगवा मागितला होता. मातंग समाजाचे मते मिळवण्यासाठी विविध संघटनाचा पाठिंबा आणि मिळावे घेतले. मात्र या आमदारांनी निवडून आल्यानंतर आपली खरी नियत समाजाला दाखवली आहे. विधानभवनात शपथ विधी वेळी सदरील आमदारांनी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव घेण्यास विसर पडला. त्यामुळे या आमदारांचा खरा चेहरा समाजासमोर उघड पडला असून मातंग समाजातून या घटनेचा निषेध नोंदवत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. इथून पुढे निवडणुकीमध्ये लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव घेऊन राजकारण करू नका



असा इशारा मातंग समाजाचे युवा नेते संजय धुरंधरे यांनी दिला आहे.



## सिरजखोड प्राथमिक आरोग्य केंद्र येथे ३५ महिलांची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संपन्न

धर्माबाद (अशोक पडोळे)

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सिरजखोड येथे लपोस्क्रापी कुटुंब नियोजन (एक टाका) शस्त्रक्रिया कॅम्प चे दि: ६ रोजी आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण ३५ महिलांची लपोक्रापी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया सर्जन डॉ. संतोष अंगरवार यांनी यशस्वीरित्या ऑपरेशन पार पडले आहे.सदरील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया हे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.नसिंमबानो शेख व कोन्हेरी मॅडम यांच्या मार्गदर्शनानुसार सदरील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.याकामी आरोग्य कर्मचारी नामेवर मॅडम व सिस्टर शिल्पा चींतलवार, साईनाथ जिंकले, महेश मराठे,राहुल भगत,कपिल पाटील, म्बुलन्स चालक मारोती बकवाड, दावलबाजे सुनील, नागोराव भंडारे,गोविंद जिंकले,तुकाराम जाधव, संघमित्रा धडे, आशा सेविका सीमा खानापुरे तसेच आरोग्य सेवक -सेविका इत्यादी कर्मचारी सदरील कॅम्प यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले

## हऱ्या नाऱ्याची गोष्ट सांगत आ.सुरेश धस विरोधकावर बरसले

आष्टी ।प्रतिनिधी

५३ सिटाची एस टी असते परंतु एस टी भरेल एवढ्या जागा देखील महविकास आघाडीच्या आल्या नाहीत त्यामुळे त्यांनी शांत राहावे म्हणत हऱ्या नाऱ्याची गोष्ट सांगत विधानसभेच्या पहिल्याच विशेष अधिवेशनात आ.सुरेश धस विरोधकांवर चांगलेच बरसले.



सोमवारी विधानसभेच्या विशेष अधिवेशनाचा तिसरा आणि शेवटचा दिवस होता.गेल्या दोन दिवसांपासून जवळपास सर्व आमदारांनी शपथ घेतल्यानंतर सोमवारी विधानसभा अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.यावेळी नार्वेकर यांच्या अभिनंदन प्रस्तावावर बोलताना आ.सुरेश धस यांनी आपल्या अस्सल ग्रामीण भाषेत नुकत्याच विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्लेल्या महाविकास आघाडीने आता शांत राहाव असे सांगत राहुल नार्वेकर यांनी आजपर्यंत विधानसभेचे अध्यक्ष म्हणून आपली चोख भूमिका पार पाडली आहे.स्वतः वकील असल्याने त्यांना कायद्याचा अभ्यास आहे ते योग्यरीत्या सभागृह चालवतील आणि प्रत्येकाला बोलण्याची संधी ते देतील असा विश्वास आ.धस यांनी व्यक्त केला.तर दुसरीकडे विरोधकांची निवडून आलेल्या आमदारांची एकूण बेरीज पाहता एस. टी.देखील भरणार नाही असे म्हणत हऱ्या नाऱ्याची गोष्ट सांगत विरोधकांवर चांगलेच बरसले.त्याच्या याच भाषणाची सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे.

# लोक जनशक्ती पार्टीच्या केज तालुकाध्यक्षपदी गंगाधर पौळ तर अंबाजोगाई तालुकाउपाध्यक्षपदी सागर निरगुडे यांची निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी लढणारा पक्ष म्हणून लोक जनशक्ती पार्टीची संपूर्ण देशात सर्वदूर ओळख आहे. लोक जनशक्ती पार्टी व दलित सेनाचे संस्थापक नेते दिवंगत माजी केंद्रीय मंत्री रामविलासजी पासवान यांच्या प्रेरणेने व सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करीत असलेल्या लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांनी मागील काही वर्षांपासून मराठवाडा विभागात लोक जनशक्ती पार्टीला संघटनात्मक दृष्टीने अधिक बळकट करून पक्षाचा सर्वदूर विस्तार करण्याचे काम करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून केज तालुकाध्यक्षपदी गंगाधर अंबादास पौळ तर अंबाजोगाई तालुका उपाध्यक्षपदी सागर निरगुडे यांची निवड केली आहे. निष्ठावंत कार्यकर्ते गंगाधर पौळ व सागर बंडू निरगुडे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे अन्न, प्रक्रिया खात्याचे कॅबिनेट दर्जाचे मंत्री चिरागजी पासवान, युवा राष्ट्रीय अध्यक्ष प्रणव कुमार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मोहन अनमोलू यांच्या आदेशावरून लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्षपदी राजेश बालाजी वाहुळे व बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे यांच्या हस्ते केज तालुकाध्यक्षपदी गंगाधर पौळ तर अंबाजोगाई तालुका उपाध्यक्षपदी सागर निरगुडे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. नियुक्तीपत्रात केज व अंबाजोगाई तालुक्यात पक्ष बळकटीसाठी संघटन मजबूत व व्यापक करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करून दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्याकरिता सदैव प्रयत्नशील रहावे, आपण केलेल्या कामाचा आढावा दर दोन महिन्यांनी पक्षाच्या कार्यालयात सादर करावा अशी अपेक्षा व्यक्त करून निवडीबद्दल पौळ आणि निरगुडे यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, प्रदीप घुंडरे (अंबाजोगाई शहराध्यक्ष लोक जनशक्ती पार्टी युवा.), आदित्य चौरे (अंबाजोगाई विद्यार्थी तालुकाध्यक्ष.), दिनेश धाट, विशाल शेवाळे (परळी तालुकाध्यक्ष) तसेच अर्जुन बरले, नागनाथ ढगे, सुशिल ढवारे, अभिषेक पवार, कैलास मस्के, किरण घुमरे, अरबाज पिंजारी, लखन पौळ, सत्यजित पौळ, अभिषेक पौळ, राया शिंदे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



लोक जनशक्ती पार्टीला संघटनात्मकदृष्ट्या बळकट करणार :राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे अन्न, प्रक्रिया खात्याचे कॅबिनेट दर्जाचे मंत्री चिरागजी पासवान, युवा राष्ट्रीय अध्यक्ष प्रणव कुमार, युवा प्रदेशाध्यक्ष मोहन अनमोलु यांच्या नेतृत्वाखाली यापुढील काळात ही दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करून त्यांना न्याय मिळवून देण्याकरिता सदैव प्रयत्नशील राहूत. युवकांना संधी दिली जाईल. संघटनेच्या सर्व आजी - माजी ज्येष्ठ व युवा पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन लोक जनशक्ती पार्टी हा पक्ष मराठवाड्यात संघटनात्मकदृष्ट्या अधिक मजबूत व बळकट करणार आहोत.

- राजेश वाहुळे

# ई.व्ही.एम मशीन बंद करून राज्यात ब्यालेट पेपरवर फेर निवडणूका घ्याव्यात - माजी आमदार पृथ्वीराज साठे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नुकत्याच महाराष्ट्र राज्यात विधानसभेच्या निवडणुका संपन्न झाल्या आहेत. या निवडणुकीत महायुतीला त्यांच्या अपेक्षित निकालापेक्षा अधिकचे यश मिळाले आहे. मात्र बऱ्याच ठिकाणचे निकाल हे संशयास्पद असल्याचे आढळून आले आहेत त्यामुळे राज्यात अनेक ठिकाणांहून फेरमतमोजनी तथा फेरमतदान घेण्याची मागणी होऊ लागली आहे. अशीच ईव्हीएम मशीन बंद करून ब्यालेट पेपर वर फेरमतदान घेण्याची मागणी केज विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार तथा माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांच्या मार्फत मुख्य निवडणूक आयुक्त भारत सरकार तथा महाराष्ट्र राज्य यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी पृथ्वीराज साठे यांच्यासोबत महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



पृथ्वीराज साठे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आम्ही भारतीय नागरिक म्हणून आम्हाला आमच्या मर्जीप्रमाणे मतदान करण्याचा व लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे आणि तो अधिकार आम्ही मतदानाच्या रुपात वापरतो आहोत. आजही अमेरिका, जर्मनी, नेदरलँड, इटली सह बरेच प्रगत राष्ट्र ब्यालेटवर पेपरवर निवडणुका घेतात. पूर्वी भारतातसुद्धा निवडणुका या ब्यालेट पेपरवरच घेण्यात येऊन निकाल घोषित केला जात होता. सदर निवडणुकासाठी वेळ लागत होता परंतु निडणुका विश्वासपूर्वक व पारदर्शकपणे पार पाडल्या जात होत्या. परंतु सध्या देशासह राज्यातील निवडणुका ह्या ई.व्ही.एम मशिनवर घेण्यात येत आहेत. ई.व्ही.एम.हे मुळात एक यंत्र असून सदर यंत्रासोबत बहुतांश ठिकाणी छेडछाड करून झालेल्या निवडणुका व निकाल प्रभावित केल्या जात असल्याचा संशय येत आहे . लोकशाहीमध्ये जर अशा प्रकारे जनमानसाच्या इच्छेविरुद्ध व संशयास्पदपणे निवडणुका घेतल्या गेल्या व त्या प्रभावित करून सरकार स्थापन केले गेले तर ते नागरिकांच्या मतांची बेईमानी केल्यासारखे होऊन मतदारांनी केलेल्या मतदानाची किंमत राहणार नाही आणि देश हुकुमशाही शक्तींच्या अधिपत्याखाली येईल. यामुळे देशाची संविधानिक लोकशाही देखील धोक्यात येईल अशी भीती या निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे . महाराष्ट्र राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणूका पार पडल्या. या निवडणूका जनमताच्या विपरीत जाऊन जनतेकडून त्यांची मते जाणून न घेता ई.व्ही.एम.द्वारे घेण्यात आल्या असून सदर निवडणूक हि संशयास्पद असून निवडणूक आयोगातील अधिकारी यांनी सत्ताधारी राजकीय पक्षांसोबत संगनमत करून या निवडणुकीत गैरप्रकार करत ई.व्ही.एम. यंत्रात छेडछाड करून विधानसभेचे निकाल प्रभावित केलेले आहेत. यामुळेच या निवेदनाद्वारे आम्ही मागणी करतो कि ई.व्ही.एम मशिनद्वारे घेण्यात आलेली विधानसभा निवडणूक २०२४ ही रद्द करण्यात यावी व फेरमतदान ब्यालेट पेपरवर घेण्यात यावे. आमच्या या मागणीची दखल न घेतल्यास आम्ही रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने जनांदोलन उभारू असा इशाराही पृथ्वीराज साठे व त्यांच्या महाविकास आघाडीतील अनेकक सहकार्यांनी दिला आहे.

## केज येथे चंपाषष्ठी सणा निमित्त लंगर तोडण्याचा कार्यक्रम संपन्न



केज/प्रतिनिधी

केज येथे चंपाषष्ठी सणा निमित्त लंगर तोडण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. केज येथील उमरी रोड, अहिल्या नगर येथील प्रसिद्ध खंडोबा मंदिर देवस्थानात चंपाषष्ठी निमित्त लंगर तोडणे, वाघ्या -मुरळी,गोंधळी, वारूवाले,आराधी मंडळ यांचे विविध कार्यक्रम पार पडले,यावेळी केज शहरा तील खंडोबा मंदिर परिसरामध्ये चंपाषष्ठी निमित्त वारू वाल्याचे, आराधी वाल्याचे असे प्रत्येक वर्षी कार्यक्रम होतात,

लंगर तोडल्या जातो,वारू वाले वसारी खेळतात आराध्याची गाणे होतात आणि चंपाषष्ठी दिवशी मोठा भंडारा म्हणजेच आणि जेवणाचा,महाप्रसादाचा कार्यक्रम होतो.यावेळी बिभिशन (अण्णा)गाढवे शिवाजी चेपट,चंद्रकांत गुंड,सचिन रांजणकर, बालासाहेब भुतकर, अमोल रोडे,अमोल सौदागर,कृष्णा रोडे, संभाजी रोडे,आबा लांडगे,सुखदेव लांडगे, रोहिदास गाढवे,रमेश पारवे,नंदू पौळ,नवनाथ कोकाटे,काशिनाथ रोडे, गव्हाणे व इतर समाज बांधव मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# शाहू महाराज संस्थेचे अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

शाहू महाराज बहूउद्देशिय सेवाभावी संस्था व शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे यांचा ५१ वा वाढदिवस मोठ्या थाटात दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी आष्टी येथील त्यांच्या भव्य अशा संकुलात मोठ्या थाटात संपन्न झाला.

प्रथमतः त्यांचा कौटुंबिक अभिष्टचिंतन सोहळा बिवरे देवा यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी त्यांच्या मातोश्री तसेच सौभाग्यवती व त्यांचे सर्व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्यांचा कौटुंबिक औक्षण करुन व केक कापून अभिष्टचिंतन केले. यावेळी शाहू महाराज कनिष्ठ महाविद्यालय डोईठाण यांच्या वतीने ५१ तोफांची सलामी देऊन सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या संस्थेच्या वेगवेगळ्या शाखेच्या वतिने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे, अमृतराव पोकळे, प्राचार्य सोपानराव निंबोरे, डॉ. झांजे साहेब यांनी आपली मनोगते व्यक्त करून सुखदेवरावजी पोकळे साहेबांना शुभेच्छा देवून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या अभिष्टचिंतन सोहळ्यास संजय पोकळे, भाऊसाहेब काळे, रेल्वे विभागातील पोकळे साहेब, दळवी सर, ज्ञानेश्वर पोकळे, सभापती सौ. जगताप व श्री जगताप, खाडे सर, प्रा. नानवटे सर, तांबोळी बंधू, नागरे सर, डॉ. शुभम खाडे, मुख्याध्यापक सुरेश पवार, सय्यद शफी भाई, प्रा. पठाडे सर, प्राचार्य सूर्यकांत मोकाशे साहेब, तळेकर साहेब, केतन पोकळे, पंचायत समिती मधील आबदार साहेब, हजारे साहेब, रवींद्र ठाकूर, अशोक माने, पत्रकार आण्णासाहेब साबळे, मुख्याध्यापक विजय झांजे सर, मुख्याध्यापक के. के. थोरवे सर, मुख्याध्यापक काशीद सर, अमोल थोरवे, काकासाहेब थोरवे, भाऊसाहेब ननवरे, शिवाजी नलावडे, सुधीर घोडके, पांडुरंग पोकळे, सुधीर शिंदे, सतीश आवारे, शिवाजी रणसिंग, मनोहर कवडे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब राख यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन शाहू महाराज कनिष्ठ महाविद्यालय डोईठाण चे प्राचार्य प्रा. बाळासाहेब राख व



त्यांचे कर्मचारी प्रा. जी. के. देवकर, प्रा. एस. एस. वाळके, प्रा. एस.बी. महाजन प्रा. ए. पी. थोरवे, प्रा. ए. ए. शेख, श्रीमती झांबरे मॅडम यांनी कठोर परिश्रम घेऊन केले. यावेळी सर्वांना सुरुची भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.


THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिओ गीता परिवार, माहेश्वरी प्रगती मंडळ बीडद्वारा एक मिनिट, एक साथ, गीता पाठाचे उद्या आयोजन

## परिवारासोबत गिता ग्रंथ पूजन,गीता जयंतीच्या कार्यक्रमास शहरातील महिला, पुरुष भावीकभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- गिता परिवार

**बीड /प्रतिनिधी**
**प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी राष्ट्रसंत परमश्रद्धेय गुरुवर्य गीतामनीषी श्री. ज्ञानानंदजी महाराज (वृंदावन निवासी) यांच्या प्रेरणेने विश्व बंधुत्व, शांति, सद्भाव, सुख, समृद्धी पर्यावरण शुद्धी तसेच राष्ट्र गौरवार्थ सखल भारतीयांसाठी गिता परिवार, वृंदावन यांनी बीड शहरातील गीता सत्संग मंडळ व महिला मंडळ यांच्या सहकार्याने ५१५७ वी गीता जयंतीचेऔचित्य साधून पेठ बीड भागातील संतोषी माता मंदिर जुना मोंढा येथील** सभागृहात मोक्षदा एकादशीच्या पावन पर्वानिमित्त उद्या बुधवार दि.११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वा. मोठ्या उत्साहात संपन्न होत असून गिता जयंती राष्ट्रसंत श्री. ज्ञानानंदजी महाराज यांच्या प्रेरणेने, आज्ञेने जगभर मोठ्या आनंद, भक्तीभावाने संपन्न होत आहे.

गीता जयंतीनिमित्त एक मिनट,एक साथ गिता ग्रंथ पूजन, गिता पाठाचे ,आरती पेठ बीड भागातील संस्थान श्री दक्षीणमुखी हनुमान टेकडी मंदिर सभागृहात बुधवार सकाळी ठिक ९.३० वा. संपन्न होत असून मोठ्या उत्साहात यानिमित्ताने भगवद्गीतेचे सामूहिक १२ वा, १५ वा आष्टादश अध्यायाचे सामूहिक पठण होणार असून बीड शहरातील महिला, पुरुष भाविकभक्तांनी गीता जयंतीच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्ती आनंदाचा लाभ घ्यावा असे आवाहन जियो गिता परिवाराचे अध्यक्ष विष्णुदास बियाणी, पदाधिकारी सुरज लाहोटी, डॉक्टर राजेंद्र सारडा, प्रशांत पवळ, सीताराम उबाळे, सखाराम नखाते, लताताई मस्के, मंजुषा, अग्रवाल, सौ. गीता अग्रवाल, सौ. सविता पवळ तसेच माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, सचिव जुगलकिशोर बियाणी व सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी केले.




या कार्यक्रमात गिता पूजन, भजन, शांती, पठण, सद्भावना, प्रार्थना, भगवद्गीतेची आरती करण्यात येणार आहे. पसायदान घेऊन अल्पोपहार व दुग्धपान घेऊन मोक्ष एकादशीचे औचित्य साधून गीता जयंती समारोह अत्यंत उत्साहात साजरा होत आहे.

तरी बीड शहरातील सर्व शाळा, महाविद्यालय, सामाजिक, शैक्षणिक संस्था, धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्यातील प्रतिष्ठित मान्यवर गीता जयंतीच्या कार्यक्रमात सहभागी होत असून बीड शहरातील महिला पुरुष भाविक भक्तांनी गीता जयंतीच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जियो गिता परिवाराचे विष्णुदास बियाणी, सुरज लाहोटी, डॉक्टर राजेंद्र सारडा, लताताई मस्के, मंजुषा अग्रवाल, सौ. गीता अग्रवाल, सौ. सविता पवळ, ह. भ. प नखाते, उबाळे, पुजारी चिंटू महाराज पांडे आदींसह भाविकभक्तांनी केले आहे.

# शाळा व्यवस्थापन समिती ढाकेफळचे अध्यक्ष ज्ञानेश्वर थोरात,उपाध्यक्ष आशाबी सय्यद यांची बिनविरोध निवड

केज/प्रतिनिधी
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ढाकेफळ शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीची मुदत संपल्यामुळे नवीन शाळा व्यवस्थापन समिती ची निवड दिनांक ७ डिसेंबर २०२४ वार शनिवार रोजी करण्यात आली.शाळा व्यवस्थापन समिती निवडीच्या बैठकी साठी अध्यक्ष धनराज अंधारे हे होते.निवडणूक निरीक्षक म्हणून केज केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चवरे हे होते.निवडणूक प्रक्रिया तरकसबंद वसंत सर यांनी पारदर्शकपणे पार पाडली.या निवडीच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांचे पालक,प्रतिष्ठित नागरिक, सरपंच,उपसरपंच,शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष,शिक्षणप्रेमी नागरिक हे सर्व उपस्थित होते.व्यवस्थापन समिती च्या निवडीच्या वेळी सर्व मतभेद बाजूला ठेवून समस्त गावकऱ्यांनी शाळेच्या हितासाठी योग्य,शाळेला वेळ देणारे, कर्तव्यदक्ष सदस्यांची बिनविरोध निवड केली.



अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर थोरात आणि उपाध्यक्ष स्थानी आशाबी सय्यद यांची निवड ही सर्वानुमते बिनविरोध करण्यात आली.शाळा व्यवस्थापन समिती निवडीच्या वेळी सर्व मतभेद बाजूला ठेवून शाळेच्या हितासाठी योग्य असे प्रतिनिधी निवडल्या बद्दल केंद्रप्रमुख संजय चवरे सर यांनी गावकऱ्यांचे कौतुक केले.

अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या ज्ञानेश्वर थोरात यांनी शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्या बरोबरच शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सांस्कृतिक तसेच क्रीडा त्मक विकासकरण्यासाठी शिक्षकांना सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगितले.निवडून आलेल्या व सर्व सदस्यांचे सरपंच रतनजी अंधारे, अरविंद थोरात,गोपाळजी थोरात,मुख्याध्यापक धनराज अंधारे केंद्रप्रमुख संजय चवरे,वसंत तरकसबंद तसेच शाळे तील सर्व शिक्षक वृंद भाऊसाहेब घाडगे रणजीत घाडगे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.ढाकेफळ च्या ग्रामस्थांनी बिनविरोध शाळाव्यवस्थापन समिती निवडून एक स्तुत्य उपक्रम राबवून आदर्श घडवला.त्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळा साईभक्तांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**बीड /प्रतिनिधी**
**श्री साई सेवा परिवार बीड यांच्या वतीने श्री दत्तजयंती निम्मित बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पालखी सोहळा दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी शिर्डीकडे प्रस्थान करणार असून यामध्ये सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.**

बीड येथील साईभक्त गत १७ वर्षांपासून बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळा काढतात. यंदाचे पायी पालखीचे १८ वे वर्ष आहे यामध्ये नऊ मुक्काम असतात. सुरुवातीच्या काळात केवळ तिघांनी हा पालखी सोहळा सुरु केला होता. आता दिवसेंदिवस पायी पालखी सोहळ्यात सहभागी होणार्या भाविकांची संख्या वाढत आहे. यावर्षी हा पालखी सोहळा दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी प्रस्थान करणार असून दि.२३ डिसेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे पोहचणार आहे. या सोहळ्यात सहभागी होण्याकरिता साईभक्तांनी ९४०५०७६५९४ व ९८५००८८६४४ या क्रमांकावर नोंदणी करावी असे आवाहन श्री साई सेवा परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



पाली येथे खंडोबा यात्रे निमित्त ठेवण्यात आलेल्या जंगी कुस्त्यांची शेवटची कुस्ती जिंकल्यानंतर स्वागत करताना शरद नवले, रवींद्र राऊत यांनी केले.

# मुद्रांक बाजारात ५०० च्या बॉण्डचा प्रचंड तुटवडा; १०० च्या बॉण्डचा आलाय ऊत!

## शासनाचे हे सुशासन की सुडासन? - एस.एम.युसूफ़

**बीड ।प्रतिनिधी**
शहरात ५०० रुपये मूल्याच्या बॉण्डचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून शासन-प्रशासन दरबारी सरकारी कामासाठी लागणाऱ्या ५०० च्या बॉण्ड ऐवजी नाविलाजाने लोकांना १०० रुपयाचे ५ बॉण्ड विकत घ्यावे लागत आहे. त्यापैकी फक्त एका बॉण्डचा वापर लेखी कामासाठी होत असून बाकीचे ४ कोरे करकरीत बॉण्ड कागदपत्रांसोबत विनाकारण जोडावे लागत आहेत. यामुळे लेखी काम एकाच बॉण्डवर होत असून सुद्धा सोबत अजून जास्तीचे व बिनकामाचे ४ बॉण्ड जोडावे लागत असल्याने लोकांमध्ये शासन-प्रशासनाविरुद्ध प्रचंड चीड व संताप व्यक्त होऊ लागला असून जर ५०० चे बॉण्ड पाहिजे तेवढ्या संख्येत मुद्रित केलेले नाही तर मग ते सक्तीने लागू कशाला केले? हे शासनाचे सुशासन आहे की सुडासन? असे उद्विग्न प्रश्नही या अवस्थेमुळे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकातून उपस्थित केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, जेव्हा १०० रुपयांच्या एका बॉण्डवर काम व्हायचे, तेव्हा लोकांना मुद्रांक विक्रेत्यांकडे १ बॉण्ड लवकर मिळायचा नाही. मिळाला तर शासन नियमाऐवजी जास्तीची रक्कम देऊन तेव्हा तो लोकांना विकत घ्यावा लागायचा. आता एकाच माणसाला तेच बॉण्ड एका कामासाठी विनासायास पाच-पाच मिळू लागलेत. एवढ्या मोठ्या संख्येने आता १०० रुपयांच्या बॉण्ड चा उत कसा, कधी आणि कुठून आला? जेव्हा हे बॉण्ड कामासाठी लागायचे तेव्हा एका बॉण्ड करिता दहा मुद्रांक विक्रेत्यांकडे हेलपाटे मारावे लागायचे. आता मात्र सरकारने १०० रुपयांचे बॉण्ड बंद करून




कोणत्याही कामासाठी ५०० रुपयांचे बॉण्ड लागेल, हा निर्णय करून त्याची अंमलबजावणी सुरू केल्याने बहुतेक दाबून ठेवलेल्या १०० रुपयांच्या बॉण्ड चा उत मुद्रांक बाजारात आला आहे. आता कोणत्याही कामासाठी ५०० रुपयांचा बॉण्ड मुद्रित करून जोडावे लागू लागले आहे. पण ते उपलब्ध नसल्याने त्याऐवजी १०० रुपयांचे ५ बॉण्ड जोडून द्यावे लागत आहेत. यामुळे शासन-प्रशासनासह लोकांना मुद्रांक विक्रेत्यांचा सुद्धा प्रचंड राग येऊ लागला आहे. बीड शहरातील न्यायालय, तहसील कार्यालय आणि रजिस्ट्री ऑफिस मधील मुद्रांक विक्रेत्याकडे बॉण्ड साठी ग्राहक गेला की, एकेकाला प्रत्येक बॉण्ड विक्रेता कुठलेही आढेवेढे न घेता १०० रुपये मूल्याचे पाच-पाच बॉण्ड ते ही अगदी सहजपणे देऊ लागला आहे. जर ५०० रुपयाचे बॉण्ड आवश्यक संख्येत मुद्रित केलेले नाही तर लागू कशाला केले? या निर्णयाची अंमलबजावणी करण्याअगोदर ५०० रुपयांचे बॉण्ड मुद्रांक बाजारात उपलब्ध करून का दिले नाही? एकेका माणसाला एक एका कामासाठी एका ऐवजी १०० रुपयांचे पाच पाच बॉण्ड विकले जात आहेत. एवढे बॉण्ड आले कुठून? कसे? आणि कधी?जोपर्यंत मुद्रांक बाजारात १०० चे बॉण्ड आहे तोपर्यंत ५०० च्या बॉण्डची सक्ती करू नये आणि एका कामासाठी १०० रुपयाचे पाच नाहीतर एकच बॉण्ड वापरण्याची परवानगी देण्यात यावी. भरमसाठ आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या १०० रुपयाच्या बॉण्डवर आता ५०० रु.ची पूर्तता १०० च्या ५ ने केली असे लिहिलेले एक स्टॅम्प मारून मुद्रांक विक्रेत्यांकडून लोकांना बॉण्डची विक्री केली जात आहे. म्हणजे किती गंमत आहे बघा, आहे की नाही? ही अवस्था पाहता जिल्हा प्रशासनानेही शासनाकडे याविषयीची वस्तुस्थिती मांडावी आणि लोकांना होणारा मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास दूर करावा. तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे आणि बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर या दोन्ही लोकप्रतिनिधींनी मुद्रांक बाजारातील या संतापजनक प्रकरणात लक्ष घालावे. असेही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.




# धारूरला श्री स्वामी समर्थ महाराजांचा पालखी सोहळा दिमाखात उत्साहात संपन्न

किल्लेधारूर ।प्रतिनिधी
धारूर शहरात श्री स्वामी समर्थ सेवा आणी आध्यात्मिक विकास केंद्र च्या दुस-या वर्धापन दिना निमीत्त शहरात पालखी उत्साहात काढून विवीध कार्यक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला. प पू गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने श्री स्वामी समर्थ सेवा आणि आध्यात्मिक विकास केंद्र किल्ले धारूर येथे सुरू होऊन दोन वर्ष पुर्ण झाली. या दोन वर्षात रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर, प्रभू श्रीराम जन्मोत्सव, दत्ता जयंती, स्वामी महाराजांची जयंती,गुरुचरित्र पारायण, संक्रांती निमित्त हळदी कुंकू असे अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच महाराजांची त्रिकाळ आरतीची सेवा, प्रहरे सेवा ,अब्ज चंडी अंतर्गत सर्व सेवा या सर्व सेवा मागील दोन वर्षात अखंडपणे सुरू आहेत. या सर्व सेवांमध्ये प्रामुख्याने महिला सेवेकरी सक्रिय असतात हे विशेष.द्वितीय वर्धापन दिन निमित्त श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिला व पुरुष सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला सेवेक-यानी फुगडी खेळत तसेच सद्गुरू प्रदक्षिणा घालून आनंदोत्सव साजरा केला. सर्व सेवेकरी यांच्या नियोजनात हा सोहळा अतिशय शिस्तबध्द पध्दतीने पार पडला. भावीक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

# वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामपंचायतीची दमछाक

## नेकनूर नगरपंचायत होणे गरजेचे

नेकनूर ।प्रतिनिधी
मागील काही वर्षात गावाची सातत्याने वाढत जाणारी लोकसंख्या व विस्तार पाहता कधी काळच्या गावाला आज शहराचे स्वरूप आले आहे . या ठीकाणी १७ सदस्यांची आसणारी ग्रामपंचायत मूलभूत सुविधा देण्यास सक्षम ठरत नसल्याने नेकनूर साठी नगरपंचायतची आवश्यकता निर्माण झाली आहे . नेकनूर हे गाव ५४८ ड या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले असून पाटोदा - केज व बीड- चौसाळा यांच्या मध्यभागी हे गाव येत असून या गावची लोकसंख्या जवळपास ३० हाजाराच्या च्या



घरात आहे . या ठिकाणी १३ हजार च्या आसपास मतदान आहे. गावचा विस्तार सुद्धा मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणावर वाढत असून जवळपास दोन ते अडीच किलोमीटर परिसरात गावचा विस्तार झाला आहे. हे सर्व घडत असताना येथील ग्रामपंचायत मात्र नागरिकांना सुविधा देण्यास पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे. गावात सर्वत्र साचलेला कचरा , नाल्यामध्ये साचलेले पाणी, स्वच्छता , आरोग्य, पिण्याचे पाणी , स्मशानभूमी , या सारख्या सर्वच मूलभूत सुविधांचा अभाव नेकनूर मध्ये जाणवत आहे . काही भागातील नागरिकांना तर वर्षानुवर्ष पिण्यासाठी विकतच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे . शासनाकडून ग्रामपंचायतला येणाऱ्या निधीतून होणारी विकास कामे हि निव्वळ वेळकाढू होत आहेत . यामुळे या समस्येमध्ये आणखीनच भर पडत आहे. त्यामुळे नागरिकांना आहे त्या परिस्थितीतच दिवस काढावे लागत आहेत. आज रोजी नेकनूर करांना सुविधा उपलब्ध होण्यासाठी नगरपंचायतची आवश्यकता निर्माण झाली आहे . केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला होता. नगरपंचायत करण्यासाठी त्यांचे प्रयत्न देखील चालू होते. पण आताच्या ग्रामपंचायतने नगरपंचायत ला खो दिल्याने नेमकी प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. नगरपंचायत झाल्यानंतर ग्रामपंचायत पेक्षा आठपट जास्त निधी येतो त्यामुळे साहजिकच गावातील नागरिकांना योग्य त्या सुविधा उपलब्ध होतील त्यासाठी नगरपंचायत होणे गरजेचे आहे पण. येथील राजकारण्याकडून या गोष्टीला सोयीस्करपणे टाळले जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.